http://www.sgbauonline.com/



**B.Com. (Part—I) Examination**

**MARATHI COMPULSORY (Old)**

**(Languages)**

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 70

1. 'बुद्धीचा महिमा' या पाठाच्या आधारे भारतीय संस्कृतीचा व्यापक विचार समजावून सांगा. 10

**किंवा**

'धर्म, तत्त्वज्ञान व विज्ञान' या पाठाच्या आधारे पंडित नेहरूंचे विचार स्पष्ट करा.

2. 'लोकशाहीचे पंचप्राण' या लेखात डॉ. आंबेडकरांनी कोणते मूलगामी विचार मांडले आहेत, ते सांगा. 5

**किंवा**

'गाडगेबाबा'या पाठाच्या आधारे त्यांच्या जीवनकार्याची महती अधोरेखित करा.

3. देशातील कोणत्या घडामोडींमुळे यशवंतराव चव्हाण यांचे तरुण मन अस्वस्थ झाले होते ? 10

**किंवा**

स्वावलंबन, श्रमप्रतिष्ठा व साधेपणा यांना अधिक महत्व देणारी महात्मागांधी यांची शिक्षण पद्धती स्पष्ट करून सांगा.

4. शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या कार्यकर्तृत्वाचे वि. भि. कोलते यांनी कसे वर्णन केले आहे ? 5

**किंवा**

एका बालमनातील चांगुलपणामुळे दुसरे मनही कसे संस्कारीत होते, ते 'संस्कार' या कथेच्या आधारे समजावून सांगा.

5. संत ज्ञानेश्वरांनी 'पसायदानातून' विश्वात्मक देवापुढे विश्वकुटुंबाची भूमिका कशी मांडली आहे ? 10

**किंवा**

राष्ट्रसंताचे वैवाहिक जीवनाविषयीचे चिंतन तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

6. 'तेव्हा एक कर' या कवितेचा आशय स्पष्ट करा. 5

**किंवा**

'अखेर कमाई' या कुसुमाग्रजांच्या कवितेचे रसग्रहण करा.

7. (1) डॉ. विजय खँडारे, शैक्षणिक सहल प्रमुख, श्री शिवाजी महाविद्यालय, अमरावती यांचे कडून महाराष्ट्र पर्यटन विभाग मादाम कामा रोड, चर्चगेट मुंबई यांना मेळघाट अभयारण्याच्या हॉलीडे कॅम्पसंबंधी चौकशी करणारे पत्र लिहा. 5

(2) ज्ञानवर्धिनी वाचनालय, वणी जि. यवतमाळे या ग्रंथालयासाठी सुगावा प्रकाशन, पुणे यांच्याकडे पुस्तकांची मागणी करणारे पत्र ग्रंथपाल प्रवीण कोलते यांच्या नावे लिहा. 5

**किंवा**



http://www.sgbauonline.com/

http://www.sgbauonline.com/

(3) गजानन शिक्षण संस्था, मूर्तिजापूर, जि. अकोला या संस्थेला दहा संगणक खरेदी करावयाचे आहेत. त्यासाठी नोबेल कॉम्प्युटर जळगांव यांना संगणकाचे प्रकार, नमुने, त्यांच्या किंमती आणि विक्री नंतरच्या सेवा या संबंधीची माहिती पाठविण्यासंबंधीचे पत्र लिहा. 5

(4) श्री. अनिल अंबुलकार यांनी कृषी विभागाच्या सचिवाकडे अर्ज केला असून त्यात आपल्या सहा एकर जमिनीत शेततळे खोदण्यासाठी कृषी विभागाकडे अनुदान मिळण्याबाबत मागणी केली आहे. शेतकऱ्याच्या मदतीसाठी सरकारने ज्या अनेक योजना राबविल्या आहेत त्यात शेततळे खोदण्यासाठी अनुदान देण्याची योजना समाविष्ट आहे. सदर्हू अर्ज वरिष्ठाकडे अग्रेषित करण्यासाठी त्यावर योग्य ते टिपण लिहा. 5

8. जाहिरातीची संकल्पना स्पष्ट करून. वृत्तपत्रातील जाहिरातीचे महत्त्व अधोरेखित करा. 15

किंवा

जाहिरात म्हणजे काय ? ते सांगून जाहिरातीचे स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.



http://www.sgbauonline.com/